# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ५६८५/२०१९ पुणे शहर, दिनांक- ०४/०७/२०१९

**विषय :- मेट्रोचे कामांमुळे नगररोडवरील गुंजनचौक येरवडा ते वडगावशेरी फाट्या पर्यंतची बीआरटी लेन सर्व प्रकारच्या वाहनांना खुली करण्यात आले बाबत.**

---

पुणे शहरामध्ये नगररोडवर मेट्रोचे कामे चालू असल्याने येरवडा येथील गुंजनचौक ते वडगावशेरी फाटा या दरम्यान वाहतुक संथ होत होती, सदर मार्गावर बीआरटी बस लेन असल्याने तसेच मेट्रोच्या कामामुळे बीआरटी मार्गातील काही बस थांबे हे बंद झाले होते, त्या मार्गावरील बीआरटी मार्ग व नॉन बीआरटी मार्गातून असे तीन वेळा बसेस बीआरटी लेनमध्ये जातात व तीन वेळा बीआरटी लेनच्या बाहेर येत होत्या, त्यामुळे दुचाकी,चारचाकी वाहनांना मोठ्याप्रमाणात अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता होती, सध्या सदर मार्गावर बसेस ह्या बीआरटी मार्गातून चालविल्या जात नव्हत्या व बीआरटी मार्गाचा वापर होत नव्हता.

त्याकरीता पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्री.पंकज देशमुख यांनी, पीएमपीएमएल प्रशासन,म.न.पा. मेट्रो यांचेशी चर्चा करुन व संयुक्त पाहणी करुन बीआरटी मार्गातून इतर वाहनांना तात्पुरत्या कालावधीकरीता प्रवेश देण्याकरीता संबधित विभागांचे समंतीने ठरविले असून येरवडा येथील गुंजनचौक ते वडगावशेरी फाटा या मार्गावरील बीआरटी लेन ही सर्व प्रकारच्या वाहनांसाठी खुली करण्यात आली आहे. त्या लेनचा वाहनचालक नागरीकांनी वापर करावा.